## खुलताबाद न.प.आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून इच्छूकांच्या मुलाखती



**खुलताबाद**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद नगरपरिषद आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खुलताबाद शहरातील १० प्रभागातील इच्छूक उमेदवारांच्या मुलाखती आज रविवारी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे संपर्क कार्यालयात इथे पार पडल्या.खुलताबाद नगरपरिषद निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांची मुलाखती राष्ट्रवादी पक्षाच्या संपर्क कार्यालयात पक्ष निरीक्षक तथा तालुकाध्यक्ष सुरेश जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत.नगराध्यक्ष पदासाठी ६ उमेदवारांनी तर नगरसेवकपदी साठी ६५ उमेदवारांनी मुलाखती दिल्या. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष दिनेश सावजी,शहराध्यक्ष गजानन फुलारे, कार्याध्यक्ष तौसीफ अहमद,शेख वाजेद यांची उपस्थिती होती.

नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक उमेदवार माजी नगराध्यक्ष कैसरोद्दीन. माजी नगराध्यक्ष हाजी अकबर बेग.माजी नगरसेवक आयाज बेग. शहराध्यक्ष गजानन फुलारे, सामाजिक कार्यकर्ते शेख वाजेद, माजी नगरसेवक मुनिबोद्दीन यांनी नगराध्यक्ष पदासाठी मुलाखती दिली.

## घरकुल लाभार्थ्यांसाठी केलेल्या आमरण उपोषणाचा विजय - योगेश अचलखांब

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**



घरकुल हप्त्याच्या वितरणाची मागणी संदर्भात जालना तालुक्यातील मानेगाव खालसा येथील युवक सामाजिक कार्यकर्ते योगेश अचलखांब यांनी माता रमाई घरकुल योजनेसह सर्व घरकुल योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या लाभार्थ्यांचे थकीत हप्ते तत्काळ वितरित करण्याच्या मागणीसाठी ग्रामपंचायत समोर आमरण उपोषण दोन दिवसापासून सुरू होते या संदर्भात दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केलेले होते की जालना पंचायत समिती समितीच्या घरकुल विभागाच्या अभियंता वर्गाच्या कम तरता असल्यामुळे अनेक लाभार्थ्यांचे प्रलंबित होते त्यामुळे घरकुल विभागात अभियंता वर्गात आवश्यक तेवढी वाढ करून प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत अशी मागणी करण्यात आली.



उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी युवा सेनेचे अभिम न्यू खोतकर यांनी उपोषणा स्थळे येऊन पंचायत समिती स्तरावर फोन लावून सूचना केले की आपण लवकरात लवकर कलेक्टर लेवलवर प्रस्ताव पाठवावा घरकुल हप्ते सात दिवसात वितरित करा यावेळी माजी आमदार अरविंद अण्णा चव्हाण यांनी उपोषण कार्यकर्त्याची भेट घेऊन पंचायत समितीचे विस्तार अधिकारी श्री आर डी देशमुख. आर एस सूर्यवंशी व मानेगाव खालसा येथील ग्रामसेवक आयु.गोरेसाहेब यांच्या लेखी प्रस्तावानंतर पाणी पाजून उपोषण सोडले यावेळी सर्व गावकरी व लाभार्थी यांनी आनंद व्यक्त केला.

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका रिपाइं महायुती सोबत लढणार: बाबुराव कदम

### पक्षाला हव्यात जि.प.च्या ५ आणि महापालिकेच्या १० जागा



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) महायुती सोबत लढणार असून कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या कामाला लागावे असे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे प्रदेश कार्याध्यक्ष बाबुराव कदम यांनी केले आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आणि महाड येथे होणारे पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन या संदर्भात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची जिल्हा आढावा बैठक आज शनिवारी दिनांक २५ ऑक्टोबर रोजी सुभेदारी विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आले होते त्यात ते बोलत होते.

या बैठकीला मराठवाडा अध्यक्ष मिलिंद शेळके राज्य उपाध्यक्ष दौलत खरात शहर जिल्हाध्यक्ष नागराज गायकवाड बाळकृष्ण इंगळे अरविंद अवसरमल रमेश दाभाडे युवा जिल्हाध्यक्ष राकेश पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी पुढे बोलताना श्री.कदम म्हणाले नुकती छत्रपती संभाजीनगरामध्ये गायरान हक्क परिषद झाली.

या परिषदेला चांगला प्रतिसाद मिळाला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पक्षाने भाजप शिवसेना महायुती सोबत लढण्याचा निर्णय घेतला आहे छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या पाच महानगरपालिकेच्या दहा जागा आणि पंचायत समितीच्या दहा जागा नगर परिषदेच्या योग्य त्या प्रमाणात रिपब्लिकन पार्टीला महायुतीने सोडाव्यात तशी मागणी महायुतीच्या नेत्यांकडे करण्यात येईल पक्ष कार्यकर्त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कामाला लागावे गाव पातळीवर जाऊन निवडणुकीची तयारी करावी ३ नोव्हेंबर रोजी पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त महाड येथे भव्य सभा आयोजित करण्यात आली असून या सभेला केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री तथा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले हे संबोधित करणार आहे याशिवाय कोकणातून अनेक मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजी नगरातून हजारो कार्यकर्ते महाडच्या अधिवेशनासाठी जाणार असल्याचे श्री.कदम यांनी सांगितले या बैठकीला मनोज सरीन किशोर साळवे सतीश महापुरे श्री.अमराव शरद शेगावकर ज्ञानेश्वर खरात सुनील अडसूळ कृष्णा वाहुळ विकास राऊत विश्वजीत काळे नितीन साळवे प्रशांत वाहुळ आनंद शिंदे रवी बागुल नितीन सूर्यवंशी धम्मपाल सुरडकर खुलताबाद तालुका अध्यक्ष फकीरराव भालेराव कन्नड तालुका अध्यक्ष संदीप सातदिवे, वैजापूर तालुका अध्यक्ष बाळासाहेब त्रिभुवन, मिलिंद जाधव, बाळासाहेब सातदिवे, अरुण सातदिवे, संतोष साबळे, सुनील बोर्डे, अरुण दरेकर, समाधान शिरसाठ, डॉक्टर जयचंद कासलीवाल, अमोल कोतकर, सुखदेव जगताप, केके जगताप, यांच्यासह जिल्ह्यातील पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## एमके इको व्हील्स आणि सर्व्हिसेसचा शुभारंभ



एमके इको व्हील्स आणि सर्व्हिसेस या नुतन भव्य दालनाचा मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते भव्य शुभारंभ करण्यात आले. याप्रसंगी सनएजचे देवीदास म्हस्के.

## बेवारस वाहनांच्या मालकांना आवाहन

छत्रपती संभाजीनगर - वेदांतनगर पोलीस ठाणे येथे बेवारस म्हणून नोंद घेण्यात आलेल्या २५ दुचाकी वाहनांची निर्गती करावयाची आहे. या वाहनांच्या मूळ मालकांनी वेदांतनगर पोलीस स्टेशनला संपर्क साधवा, असे आवाहन पोलीस निरीक्षक वेदांतनगर यांनी केले आहे.

### - सुचना -

### ‘अट्टलमत’चे ओळखपत्र जमा करण्याबाबत

‘अट्टल मत’च्या अनेक प्रतिनिधींच्या ओळखपत्राची तारीख संपली आहे. तरी त्यांनी जुने ओळखपत्र जमा करून नवीन ओळखपत्रासाठी कार्यालयाशी संपर्क साधवा. अनेक भुरटे पत्रकार अट्टलमतच्या नावाने अधिकाऱ्यांना, कंत्राटदारांना धमकवत असल्याचे कळाले आहे तरी अधिकृत प्रतिनिधींनी ओळखपत्र अपटेड करून घ्यावे, ज्या प्रतिनिधींच्या ओळखपत्रांचा कालावधी संपला आहे. त्यांची यादी पोलिसांत देण्यात आली आहे. आपल्या ओळखपत्राचा गैरवापर झाल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याची काळजी आपण घ्यावी ही विनंती.

**- संपादक**

कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स,
एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199